अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
मा.स्थायी समिती, सभा क्रमांक-२१
सन.२००६-२००७.

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक २१ सोमवार दिनांक ५/३/२००७ रोजीचे सभेचे कामकाजा बाबत.**

सोमवार दिनांक ५/३/२००७ रोजी मा.स्थायी समितीची सभा दुपारी ठिक १.०० वाजता मा. स्थायी समिती कार्यालया मध्ये भरली असता वीजचे भारनियमा मुळे कार्यालयात वीजची सोय नसल्याने मा.स्थायी समितीची सभा दुपारी २.३० वाजता मा.स्थायी समिती कार्यालयामध्ये घेण्यांत येईल अशा बाबत मा.सभापती स्थायी समिती यांनी जाहीर केले.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती, सभा क्रमांक-२१**
**सन.२००६-२००७.**

**विषय क्रमांक. १** **दिनांक ५/३ /२००७**

**ठराव क्रमांक १** **दिनांक ५/३ /२००७**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील चौपाटी कारंजा, चितळे रोड, तेलीखुंट ते आडते बाजार, झेंडीगेट ते अशोका हॉटेल या रस्त्याचे नुतणीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, वरील कामास रक्कम रूपये १९,९६,६९९/- चे खर्चास मा. महासभा ठराव क्र. ५ दि.१७/०७/२००६ अन्वये प्रशासकीय मंजूरी प्राप्त असून सदर कामाची जाहीर निविदा दै. सामना या वर्तमान पत्रामध्ये दिनांक ३०/८/२००६ रोजी प्रसिध्द करून दिनांक २८/८/२००६ ते दिनांक १४/९/२००६अखेर दुपारी २=०० वा को-या निविदा फॉर्म विक्री करण्यांत येउन दिनांक २९/९/२००६ रोजी दुपारी २=०० वा पर्यत स्विकारण्यांत आल्या सदर कामाच्या मुदती मध्ये एक निविदा प्रात्प झाली. निकोप स्पर्धा होण्यासाठी कमीत कमी ३ सिलबंद निविदा आवश्यक असल्याने सदर कामाची फेर निविदा दै. पुण्यनगरी दिनांक १/१०/२००६ रोजी प्रसिध्द करून दिनांक ३/१०/२००६ ते दिनांक १०/१०/२००६ अखेर को-या निविदा विक्री करण्यांत आली दिनांक १६/१०/२००६ रोजी दुपारी २=०० वा. पर्यत सिलबंद निविदा स्विकारण्यांत आल्या. मुदतीत एकच निविदा प्राप्त झाल्याने पुन्हा फेर निविदा क्र.२ दै. सार्वमत दि.२८/१०/२००६ रोजी प्रसिध्द करून दिनांक ३०/१०/२००६ ते दिनांक ६/११/२००६ दिनांक १३/११/२००६ रोजी दुपारी २=०० वा. च्या सिलबंद निविदा स्विकारणेच्या मुदतीत १ सिलबंद निविदा खालील प्रमाणे प्रात्प झाली आहे.

| अ.नं. | निविदा धारकाचे नांव | आलेले निविदा दर |
|---|---|---|
| १ | मे. ए.सी. शेख | १३.७१% जादा |

उपरोक्त प्रात्प दर पत्रकापैकी मे.ए.सी.शेख यांचे दर अंदाजपत्रकीय रकमे पेक्षा १७.३२ % जादा परंतु स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी आहेत. सदर दराची सन २००६-२००७ चे जिल्हा दर सुची व डांबराचा चालू दर विचारात घेता मे.ए.सी.शेख,अहमदनगर यांचे दर बाजार भावाच्या दरा पेक्षा ७.९०%जादा येत आहेत.

तरी संबंधीत ठेकेदाराशी दरा बाबत वाटाघाटी करणे योग्य होईल. तरी आदेशार्थ ऑफीस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री. सानेटक्के व्ही.जी. यांचा अहवाल असे.

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी.:-अहवालाप्रमाणे मे.ए.सी.शेख यांचे कमी दराचे निविदा दर(१३.७१ % जादा) हे सन २००६-०७ चे जिल्हा दर सुची व डांबराच्या बाजारातील चालू दर याचा विचार करून आलेल्या दरापेक्षा ७.९० % जादा व अवाजवी आहेत. संबंधीत ठेकेदाराशी निविदा दराबाबत वाटाघाटी करून निर्णय घेणे उचित होईल. आदेशार्थ सादर. दि.१८/११/२००६

अं.लेखा परिक्षक श्री. गोरे.पी.आर. :- शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावाप्रमाणे Negociation करिता बोलावणेस हरकत नाही. दि.१८/११/२००६.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- 'अ ' प्रमाणे कार्यवाही करणे योग्य. दि.२०/११/२००६.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

उपरोक्त कामांची तिसरी फेर निविदा मागवून दरपत्रक मागविले असता मे.अे.सी शेख यांची एकच १३.७१ अंदाजपत्रका पेक्षा जास्त दराची निविदा प्राप्त झाली सदर दराची सन २००६-२००७ ची जिल्हा दर सुची डांबराचे चालू दराशी तुलणा केली असता उपरोक्त दर अंदाज पत्रका पेक्षा ७.९० % जादा आहेत.

संबंधीत ठेकेदार यांना दि.२४/११/०६ चे पत्रान्वये वाटाघाटी साठी बोलाविले असता त्यांनी त्यांचे कडील दि. १/१२/२००६ चे पत्रान्वये निविदे मध्ये भरलेले दर १३.७१ जादा रास्त असलेने या दरामध्ये वाटाघाटी करणे शक्य नाही.

सदर ठेकेदार यांना दि.२८/१२/०६ रोजी मा. उपायुक्त (सा) यांचे समक्ष पुनश्च वाटाघाटी साठी बोलविले असता त्यांनी उपरोक्त कामासाठी भरलेले दर १३.७१ जादा दरापेक्षा कमी करणे परवडत नसलेचे सांगितले व दि१/१२/०६ चे पत्रा प्रमाणे भरलेले दरामध्ये निविदा मंजूर करणेची विनंती केली आहे. सदर दर हे उपरोक्त प्रमाणे तुलणा केले नुसार चालू दरा पेक्षा ७.९०% जादा दर आहेत.

तरी आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे श्री. व्ही.जी. सोनटक्के शाखा अभियंता यांचा अहवाल असे. दि.३/१/२००६

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी :- ठेकेदाराने सदर काम १३.७१ % जादा दाराने करण्या बाबत लेखी पत्र दिले आहे. सदरचे दर चालू २००६-२००७ च्या दरा पेक्षा ७.९० जादा आहेत.या पेक्षा कमी दराने काम करण्यांस ठेकेदार तयार नसल्याबाबत त्यांनी पत्र दिले आहे.सदरचे दर जादा वाटतात आदेशार्थ सादर

मा.फेर सादर,

दि.९/१/२००७ रोजी सादर केले. उपरोक्त पृथःकरणानुसार कमी निविदा धारकांचे दर सुधारीत अंदाजपत्रका पेक्षा ७.९० % जादा आहेत सदर दर शासन परिपत्रका नुसार १० % पेक्षा कमी दराचे असल्याने मंजूर करण्यांस शिफारस आहे. तुलणात्मक तक्ता मा.स्थायी समिती कडे सादर करावा (सोबत :- छाननी समितीचा अहवाल)

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल फेर सादर असे

शहर अभियंता :- छाननी समितीच्या शिफारसी नुसार मंजूरीस्तव सादर (सुधारीत अंदाजपत्रका पेक्षा ७.९० % जादा ) दि.१/२/२००७

अं.लेख परिक्षक :- सहमती दर्शक सही.

मा.उपायुक्त साहेब (सा) :-अहवालानुसार प्रस्ताव मंजूरी साठी मा.स्थायी समिती कडे सादर करणेस शिफारस आहे. दि.३/२/२००७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही .दि.०७/०२/२००७.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं. :- ऑफीस रिपोर्ट वाचून दाखवावा .

त्या प्रमाणे ऑफीस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.बारस्कर पो.ज. :- सदर कामाचे एकच टेंडर आलेले आहे.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं. :- एकच टेंडर आलेले आहे. टेंडर कुनी भरत नाही याचे कारण काय ?

मा.श्री. जोशी अ.सु. :- या कामासाठी तीन वेळेस निविदा मागविल्या आहेत तीन ही वेळेस एकच निविदा आलेली आहे.दूस-या कामांच्या चार चार निविदा आल्या आहेत.

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी.:- होय तीन ही वेळेस एकच निविदा आलेली आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- मागिल वेळी किती जादाचे दर आलेले होते.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.जोशी अ.सु.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. परंतु ठेकेदार टेंडर का भरत नाही याचा शोध घ्यावा.

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी. :- २५ एम एम डांबरी करण करणे कामा मधील अडचणी इत्यादी कारणामुळे ठेकेदार निविदा भरत नाहीत.

मा.श्री. तिवारी सु.र. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा. .

मा.श्री.त्रिपाठी सु.चं. :- कामे लवकर होतील याची काळजी घ्यावी. हे काम आलेल्या अनुदानातुन करणे आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. व मा.श्री. घुले अ.ह. :- काम लवकरात लवकर पावसाळया पूर्वी व्हावे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- हे काम पावसाळया पूर्वी होईल का?

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी.:- होय होईल.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते ऑफीस रिपोर्ट मंजूर मात्र सदर काम पावसाळया पूर्वी पूर्ण करणेत यावे.

**ठराव :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील चौपाटी कारंजा चितळे रोड तेलीखुंट ते आडते बाजार झेंडीगेट ते अशोका हॉटेल या रस्त्याचे नुतणीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट पहाता कमीचे निविदा दर धारक मे.ए.सी.शेख यांची सुधारीत अंदाजपत्रका पेक्षा ७.९०%जादा (सात पॉईन्ट नव्वद टक्के जादा ) चे दरास मंजूरी देण्यांत येत आहे.मात्र सदरचे काम पावसाळया पूर्वी करणेत यावे.ऑफीस रिपोर्ट मंजूर

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. तिवारी सु.र.

अनुमोदक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक.-२१**
**सन-२००६-२००७**

विषय क्रमांक:-२ दिनांक ५/३/२००७

ठराव क्रमांक:- २ दिनांक ५/३/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोठी रोड ते यश पॅलेस पर्यत ४५० व ३०० एम एम आर.सी.सी. पाईप (NP३क्लास) ड्रेनेज लाईन टाकणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** उपरोक्त संदर्भाकिंत विषयानुसार विनंती अहवाल की, उपरोक्त कामास प्रशासकीय व तांत्रिक मान्यते नुसार सदर कामाचे आलेले जाहीर निविदा दै. पुण्यनगरी या वर्तमान पत्रात जाहीरप्रसिध्दी देउन को-या निविदा दिनांक ३/११/२००६ ते दि.१७/११/२००६ अखेर विक्री करण्यांत येउन दिनांक १८/११/२००६ रोजी सिलबंद निविदा स्विकारण्यांत आल्या सदर निविदा मा.उपायुक्त यांचे कार्यालयात दिनांक २७/११/२००६ रोजी उघडलेअसता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | अंदाजपत्रका पेक्षा जास्त % |
|---|---|---|
| १ | ए.एस.पांडूळे, अहमदनगर | ३२.००% |
| २ | दत्त स्टील + इले. अहमदनगर | ३४.५० % |
| ३ | श्री.सुनिल राउत्त | २९.२२ % |
| ४ | मे.कुदळे / झिरपे कं. | ३२ % |

प्राप्त निविदा पैकी, क्रमांक ३ ची श्री. सुनिल राउत्त यांची निविदेतील दर अंदाज पत्रकीय रकमे पेक्षा २९.२२ % जास्त हे प्राप्त निविदे पेक्षा सर्वात कमी आहेत.

उपरोक्त निविदा सन २००५-२००६ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दर सुची प्रमाणे तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा २९.२२ % जास्तीचे आहेत.

तसेच सध्या R.C.C.पाईप, सिमेंटचे दर बाजार भावामध्ये वाढलेले आहेत. अंदाजपत्रीय तरतुदी पेक्षा R.C.C पाईप,सिमेंटचे दर खालील प्रमाणे वाढलेले आहेत.

| अ.नं. | मालाचे वर्णन | शासकीय दर पत्रकातील दर | एम.एस.एस.आय. डी. सी. चे दर | फरक |
|---|---|---|---|---|
| १ | ४५० एम.एम.आर. सी.सी. NP३ क्लास | ८६६ | १००९.३६ | १४३.३६ |
| २ | ३०० एम.एम.आर. सी.सी. NP३ क्लास | ३२५ | ३७८.४० | ५३.४० |

त्यानुसार वरील कामाकरिंता आवश्यक असणारे आर.सी.सी. पाईपचे एम एस.एस.आय.डी.सी.चे दर (सार्व. बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन, नाशिक विभाग दर सुची सन २००५-०६ पान क्र.४९६) व व म.जि.प्रा. चे दर -दरपत्रकातील दर यांची तुलणा करता एकूण रू.२,८९,८९७.४०/-इतका जादा खर्च अपेक्षित आहे. मधील दर व एम.एस.एस.आय.डी.सी.चे दराचा तुलणात्मक तक्ता व बाबत सोबत तक्ता जोडलेल आहे. प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी असणारे श्री. सुनिल राउत्त यांनी अंदाज पत्रकीय रकमे पेक्षा २९.२२ % जादा दर निविदे मध्ये नमुद केले आहेत.

एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रू.३७,१८,०००/- व आर.सी.सी.पाईप दरातील तफावत रू.२,८९,८९७.४०/- समाविष्ट

केल्यास एकूण रक्कम रूपये ४०,०७,८९७,४०/- इतकी होत आहे व सर्वात कमी दर असणा-या निविदा धारकांने निविदे मध्ये नमुद केलेली रक्कम रूपये ३७,१८,०००/- + २९.२२ % = रूपये ४८,०४,३९९.६०/- इतकी होत आहे.

त्यानुसार निविदा रक्कम + एम.एस.एस.आय.डी.सी.चे दरातील फरक यांची निविदे मध्ये नमुद केलेले दर यांची तुलना केली असता निविदे मध्ये नमुद केलेले दर हे सन २००५-२००६ चे म.जि.प्रा.चे दरपत्रक व एम.एस.एस.आय.डी.सी.चे दरापेक्षा १९.८७ % जादा आहेत.

निविदे मध्ये नमुद केलेले सर्वात कमी दर अंदाजपत्रकीय रकमे पेक्षा २९.२२ % जादा परंतु एम.एस.एस.आय.डी.सी.चे दराशी तुलणा करता अवाजवी आहेत.

तरी निविदेतील सर्वात कमी दर नमुद केलेल्या निविदाधारकास वाटाघाटी साठी बोलविणे योग्य वाटते. आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

शहर अभियंता :- शा.अ.अहवालाप्रमाणे कमी दराचे निविदा दर अवाजवी वाटतात कमी दराच्या निविदा धारकाशी दराबाबत वाटाघाटी करणे साठी लेखी पत्र देणे.

फेर सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती अहवाल देण्यांत येतो की, वरील कामाबाबत निविदेतील सर्वात कमी दर असलेल्या निविदाधारक श्री.सुनिल राउत्त यांना दि.९/१/२००७ रोजी वाटाघाटी साठी बोलविले असता त्यांनी निविदे पेक्षा २१ % जादा दराने सदरचे काम करणेस तयार असल्याचे पत्र दिले आहे.

सदरचे अंदाज पत्रक सन २००५-०६ च्या म.जी.प्रा.च्या दरसुची नुसार करण्यांत आले असून सन २००६-०७ ची म.जी.प्रा.ची दरसुची नुकतीच प्रसिध्द झाली असून त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक तयार केले असता अंदाजपत्रकीय रक्कम रू.४४,४९,२५३/-(अक्षरी रूपये चव्वेचाळीस लाख एकाणेपन्नास हजार दोनशे त्रेपन्न मात्र) इतकी होत आहे. सन २००५-०६ च्या दरसुची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रका पेक्षा सन २००६-०७ चे दराने केलेले अंदाजपत्रक रक्कम रू.७,३१,२५३/-ने जादा होत आहे.

उपरोक्त दोन्ही अदंाज पत्रकाची तुलणा केली असता सन २००५-२००६ पेक्षा सन २००६-०७ चे दरसुची नुसार केलेले अंदाजपत्रक १९.६६ % जादा येत आहे.

निविदा धारकांने वाटाघाटी नंतर नमुद केलेले दर व सन २००६-०७ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रकीय दर यांची तुलना केली असता सदरचे दर हे १.९६ % जास्त असल्याचे दिसून येत आहे.

तरी निविदा धारकांने वाटाघाटी नंतर नमुद केलेले २१.०० % जादा दर हे वाजवी असल्याने सदरचे दर मंजूर करणेस आदेशार्थ रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल फेर सादर असे.

शहर अभियंता श्री. मगर.एन.बी. :-अहवालाप्रमाणे ठेकेदाराने वाटाघाटीनुसार सदर काम मुळ अंदाज पत्रकीय दरापेक्षा २१% दराने करण्यांस तयार असले बाबत लेखी पत्र दिले आहे. सदर २१%जादा दर हे सन २००६-२००७च्या D.S.Rदरा पेक्षा१.९६%जादा आहेत म्हणजे चालू DSR दरापेक्षा १.९६ % जादा दर मंजूर करण्यांस शिफारस आहे. दि.१३/२/०७

अं.लेखा परिक्षक :- शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावाप्रमाणे 'अ' प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- अहवालानुसार प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यते साठी ठेवणे हरकतीचे नाही. दि.१४/०२/२००७.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दि.१५/२/२००७.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेबः-सदरचे कामा बाबत ठेकेदार श्री.एस.ए.पांडूळे यांचे पत्र माझे कडेस आलेले आहे ते वाचून दाखवावे.

त्या प्रमाणे ठेकेदार श्री. एस.ए.पांडूळे यांचे कोठी ते यश पॅलेस पर्यत ४५० व ३०० एम.एम.आर.सी.सी. पाईप (NP३क्लास) ड्रेनेज लाईल टाकणेचे काम अंदाजपत्रकीय रकमे पेक्षा २० % जादाचे दराने करणेस तयार असले बाबतचे पत्र सभे मध्ये वाचून दाखविले.

शहर अभियंता श्री.मगर.एन्.बी. :- आलेले कमीचे निविदा दरधारक श्री.सुनिल राउत हे अंदाज पत्रकीय रकमे पेक्षा २१% जादा दराने करणेस तयार आहेत.

मा.श्री. जोशी अ.सु. :- ठेकेदार श्री. एस्.ए.पांडळे, हे अंदाज पत्रकीय रकमे पेक्षा २० % जादा चे दराने काम करण्यांस तयार असले बाबत त्यांनी मा.सभापती साहेबां कडेस पत्र दिलेले आहे. त्यांना निगोशिएशन च्या वेळी बोलावण्यांत आलेले नाही.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- सर्व टेंडर भरणारांना निगोशिएशन चे वेळी बोलावण्यांत येत नाही फक्त कमीचे निविदा धारकासच बोलावण्यांत येते तशी अकौंटकोड मध्ये तरतुद आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- लोएस्ट निविदा धारकास बोलावता येते आणि इतरांना बोलावता येत नाही असे नाही सहा रस्त्याचे कामाला मंजूरी कशी दिली.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- पूर्वी सेकंन्ड लोएस्ट निविदा धारकाचे टेंडर मंजूर केलेले आहे. म.न.पा.चा आर्थिक फायदा होत असल्याने व ठेकेदार श्री.पांडुळे एस.ए.हे कमीचे दराने काम करण्यांस तयार असल्याने त्यांना काम द्यावे.

मुख्य लेखा परिक्षक श्री. कदम ए.आर. :- मा.स्थायी समिती निर्णय घेउ शकते.

मा.सभापती साहेब :- सेकंन्ड लोएस्ट निविदा धारकास काम देता येईल का ?

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी. :- आपण निर्णय घेउ शकता.

मा.श्री. जोशी अ.सु. :- स्थायी समितीने मंजूर केलेल्या ठरावा प्रमाणे कार्यवाही होत नाही. विषय मंजूर नसतांना पाईप खरेदी ची ऑर्डर कशी दिली.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- स्थायी समितीचा ठराव पाठविला नसतांना जनरल बोर्डा मध्ये चर्चा करून विषयाला मंजूरी देतात हे योग्य नाही.

मा.श्री. जोशी अ.सु. :- स्थायी समितीला काय अधिकार आहेत. स्थायी समितीने ठराव केला त्या ठरावाचे उलंघन केले तर मा.स्थायी समितीचा अवमान नाही का? स्थायी समितीची मंजूरी न घेता जीवन प्राधिकरणाचा दर करार असलेल्या दराने पाईप खरेदीची ऑर्डर कशी दिली.आम्ही खरेदी ऑर्डर देतांना मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे बाबत ठराव केला होता त्या प्रमाणे नियमानुसार कार्यवाही होणे आवश्यक होते. हे स्थायी समितीचे अधिकारावर अतिक्रमण आहे.

मा.श्री.शेख मुदस्सर अ.इ.:-ठेकेदार श्री. पांडुळे एस.ए.यांनी दिलेल्या पत्राप्रमाणे त्यांचे दर मंजूर करावे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- ठेकेदार श्री.पांडुळे यांचे दर मंजूर करावे.

मा.सौ. भागानगरे म.प्र. :- श्री. पांडुळे यांचे दर मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- ठेकेदार श्री. एस.ए.पांडुळे यांनी सदर चे काम एस्टीमेट रकमे पेक्षा वीस टक्के जादा या कमीचे दराने काम करण्यांस तयार असलेने व म.न.पा.चा आर्थिक फायदा होत असल्याने श्री. पांडुळे यांचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोठी रोड ते यश पॅलेस पर्यत ४५० एम एम व ३०० एम एम आर.सी.सी. पाईप (NP३क्लास) ड्रेनेज लाईन टाकणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट ,तसेच सदर कामाची निविदा दाखल करणारे ठेकेदार श्री.एस.ए.पांडुळे यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय रकमे पेक्षा वीस टक्के जादा दराने करणेस तयार असले बाबत आज दिनांक ५/३/२००७ रोजी दिलेल्या पत्रावर सभे मध्ये झालेल्या सविस्तर चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

महानगरपालिकेचे आर्थिक हिताचे दृष्टीने निविदाधारक श्री.एस.ए.पांडुळे हे सदरचे काम अंदाजपत्रकीय रकमे पेक्षा वीस टक्के जादा चे दरात करणेस तयार असलेने व त्या बाबत त्यांनी तसे पत्र दिलेले असलेने त्यांचे कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. भागानगरे म.प्र.

अुमादेक :- मा.श्री. जोशी अ.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-२१**
**सन-२००६-२००७**

विषय क्रमांकः-३ दिनांक ५/३/२००७

ठराव क्रमांकः- ३ दिनांक ५/३/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील जिल्हाधिकारी कार्यालय ते हातमपूरा बुरूडगल्ली पंचपीर चावडी म.न.पा.कार्यालय, दो बोटीचीरा, कोर्ट गल्ली, चौपाटीकांरजा ते दिल्ली दरवाजा या रस्त्याचे नुतणी करण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्यावरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, वरील कामास मा.महासभा ठराव क्र.५ दिनांक १७/७/२००६ अन्वये प्रशासकीय मंजूरी प्राप्त असून सदर कामाची जाहीर निविदा दै. सामना या वर्तमान पत्रामध्ये दिनांक ३०/८/२००६ रोजी प्रसिध्द करून दिनांक २८/८/२००६ ते दिनांक १४/९/२००६ अखेर दु.२.०० वा.को-या निविदा फॉर्म विक्री करण्यांत येउन दिनांक २९/९/२००६ रोजी दु.२.०० वा. पर्यत स्विकारण्यांत आल्या सदर कामाच्या मुदती मध्ये दोन निविदा प्राप्त झाल्या निकोप स्पर्धा होण्यासाठी कमित कमी ३ सिलबंद निविदा आवश्यक असल्याने सदर कामाची फेर निविदा दै. पुण्यनगरी दिनांक १/१०/२००६ रोजी प्रसिध्द करून दिनांक ३/१०/२००६ ते दिनांक १०/१०/२००६ अखेर को-या निविदा विक्री करण्यांत आली दिनांक १६/१०/२००६ रोजी दु.२.०० वा. पर्यत सिलबंद निविदा स्विकारण्यांत आल्या मुदतीत एकच निविदा प्राप्त झाल्याने पुन्हा फेर निविदा क्र.२ दै. सार्वमत दिनांक २८/१०/२००६ रोजी प्रसिध्द करून दिनांक ३०/१०/२००६ ते दिनांक ६/११/२००६ अखेर को-या निविदांची विक्री करण्यांत आली व दिनांक १३/११/२००६ रोजी दु.२.०० वा. च्या सिलबंद निविदा स्विकारणेच्या मुदतीत २ सिलबंद निविदा खालील प्रमाणे प्राप्त झाल्या.

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | आलेले निविदा दर |
|---|---|---|
| १ | मे.ए.सी.शेख | १७.३२ % जादा |
| २ | मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कं. | ८.९९ % जादा |

उपरोक्त प्राप्त दरपत्रका पैकी मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कं. यांचे दर अंदाजपत्रकीय रकमे पेक्षा ८.९९ % जादा परंतु स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी आहेत. सदर दरांची सन २००६-२००७ चे जिल्हा दर सुची व डांबराचा चालू दर विचारात घेता सर्वात कमी दर असणारे मे .बेस्ट कंन्स्ट्रक्शन कं.अहमदनगर यांचे दर ३.४२ % जादा येत आहेत. दर वाजवी वाटतात.

तरी सदर दराबाबत योग्य ते आदेश होणेस्तव ऑफीस रिपोर्ट सविनय सादर

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री.व्ही.जी. सोनटक्के यांचा अहवाल असे.

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी. :- शाखा अभियंता यांचे अहवालाप्रमाणे मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपणी यांचे कमी दराचे निविदा दर हे अंदाजपत्रकीय दरा पेक्षा ८.९९ % जादा आहेत व सन २००६-२००७ ची शासकीय दर सुची व डांबराचा बाजारातील चालू दर याचा विचार करता अंदाजपत्रकीय दरा पेक्षा ३.४२% जादा येत आहेत सदर कमी दराचे निविदा दर वाजवी वाटतात. मंजूरीस्तव तथा आदेशार्थ सादर. दि.१८/११/२००६

अंतर्गत लेखापरिक्षक श्री.पी.आर.गोरे :- शहर अभियंता यांचेकडील प्रस्तावाप्रमाणे मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन यांचे कमीचे दरास मान्यता देणेस हरकत नाही. दि.१८/११/२००६

मा.उपायुक्त साहेब (सा) :- निगोशिएशन करणे योग्य . दि.२०/११/२००६.
मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दि.२३/११/२००६.

उपरोक्त कामाबाबत वाटाघाटी करिंता स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी दरपत्रक धारक मे बेस्ट कंन्स्ट्रक्शन यांना मा.उपायुक्त (सा) यांचे समक्ष दि.२८/१२/०६ बोलोविले असता त्यांनी उपरोक्त काम ८.९९ % जादा दरापेक्षा उपरोक्त काम ६.९९ % जादा दराने करणेस तयार असले बाबत लेखी पत्र दिले आहे. सदर दराची सन २००६-०७ चे जिल्हा दरसुची नुसार तुलणा केली असता सदर दर सन ०६-०७ चे दरा पेक्षा १.५२ % जादा दराने येत आहेत.

सदर दर वाजवी असलेने मंजूर करणेस हरकत नाही आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री. सोनटक्के यांचा अहवाल असे. दि.२१/११/०६

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी. :- संबंधीत ठेकेदाराने सदर काम ६.९९ % जादा दराने करण्यांस लेखी संम्मती दिली आहे. सदरचे दर २००६-०७ च्या D.S.R दरा पेक्षा १.५२ % जादा येतात. सदरचे दर वाजवी वाटतात मंजूर करणेस हरकत नाही. दि.८/०१/२००७

मा.फेर सादर,

दि.९/०१/२००७ रोजी छाननी समिती पुढे सादर केले असता उपरोक्त प्रमाणे प्रथ:करणा नुसार सुधारीत अंदाजपत्रका पेक्षा १.५२ % जादा आहेत दर योग्य असलेने समिती कडून मंजूरी साठी शिफारस करण्यांत येत आहे सोबत छाननी समितीच अहवाल.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल फेर सादर असे.

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी.:- अहवालाप्रमाणे अंदाज पत्रकीय दरा पेक्षा ६.९९% जादा दराने म्हणजे चालू २००६-२००७ चे D.S.R दरापेक्षा १.५२ % जादा दराने निविदा दर मंजूर करणे बाबत छाननी समितीने शिफारस केली आहे. मंजूरी करिंता सादर. दि.१८/०१/२००७.

अंतर्गत लेखा परिक्षक :- फेर सादर, शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे व निगोशिएशन प्रमाणे तसेच छाननी समितीचे निर्णया नुसार ६.९९ % जादा दराने काम करून घेणे बाबत मान्यता देणेस हरकत नाही. दि.३१/०१/२००७.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- अहवालानुसार प्रस्ताव मान्यते साठी मा.स्थायी समिती कडे पाठविणेस शिफारस आहे. दि.३/०२/२००७.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- हया प्रकरणामध्ये ही फक्त कमीचे निविदा धारकासच निगोशिएशन साठी बोलावलेले आहे.

मा.उपायुक्त साहेब (सा ):- अकौंटकोड मध्ये असलेल्या तरतुदी नुसार सर्व निविदा दाखल केलेल्या निविदा धारकास निगोशिएशन साठी बोलावण्यांत येत नाही फक्त कमीचे निविदा दर धारकास बोलावंण्यात येते

मा.श्री. जोशी अ.सु.:- संस्थेचा फायदा होणे साठी सर्वाना निगोशिएशन साठी बोलावणे आवश्यक आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- पूर्वी थर्ड लोएस्ट मारूती कंन्स्ट्रक्शन कंपणीला काम कसे दिले.

मा.सभापती साहेब :- या कामाच्या कमी दराच्या निविदा कुनाच्या आहेत.

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी .:- मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन यांचे कमीचे दर प्राप्त झालेले आहेत.

मा.सभापती साहेब :- यांचे सक्कर रोड चे कामाचे जादा खर्चास मंजूरी दिलेली आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- एन. सुमती लाल ते टिळक रोड व पुढील रोडचे कामासाठी आठ लाखाचे जादा खर्चास मंजूरी दिली होती जनरल बोर्डा मध्ये त्या बाबत चर्चा उपस्थीत केली होती. चांगले काम न करणारास आपण खर्च वाढवून देतो. अशांना काम दिल्याने काम चांगले होत नाही.

शहरअभियंता श्री. मगर एन्.बी.:- सदरचे काम चांगले झाले आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- याच कामाचा जादा खर्च मंजूर केलेला होता एक रूपयाचे काम दीड रूपयात करून घेतले आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- हे काम पी.डब्ल्यु.डी कडे देउन त्यांचे कडून करून घेता येईल का ?

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी. :- आपण निर्णय घ्यावा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- सदर कामाचे सेकंन्ड लोएस्ट निविदादर धारक यांना निगोशिएशन साठी बोलवावे ते जर कमीचे दरा मध्ये काम करण्यंास तयार असले तर त्यांना काम द्यावे.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- सेकन्ड लोएस्ट निविदा धारकास निगोशिएशन साठी बोलवावे.

मा.श्री. तिवारी सु.र.:- सेंकन्ड लोएस्ट निविदा धारकास निगोशिएशन साठी बोलवावे ते जर कमीचे दरात काम करणार असले तर त्यांना काम देण्यंात यावे तसा प्रस्ताव पाच दिवसात स्थायी समिती पुढे ठेवावा.

मा.श्री. घुले अ.ह. :- सेकन्ड लोएस्ट निविदा धारकास निगोशिएशन साठी बोलवावे.

मा.सभापती साहेब :-मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपणीचे कामाची क्वालीटी चांगली नसल्याने सेकंन्ड लोएस्ट निविदा धारक यांना सर्वानुमते निगोशिएशन साठी बोलावण्यंात यावे.कमीचे दरात काम करण्यंास ते तयार असल्यास तशा बाबतचा प्रस्तावा मा.स्थायी समिती पुढे सादर करण्यंात यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील जिल्हाधिकारी कार्यालय ते हातमपूरा बुरूडगल्ली पंचपीर चावडी म.न.पा.कार्यालय, दो बोटीचीरा, कोर्ट गल्ली, चौपाटीकारंजा ते दिल्ली दरवाजा या रस्त्याचे नुतणी करण करणे कामी मागविण्यंात आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्यावरील ऑफीस रिपोर्टा वर सभे मध्ये झालेल्या साधक बाधक चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यंात येत आहे.

सदर कामाचे आलेले कमीचे निविदा दराचे निविदा दर धारक यांचे कामाची क्वालीटी चांगली नसल्याने सदर कामाचे सेकंन्ड लोएस्ट निविदा धारक यांना निगोशिएशन साठी बोलावण्यंात यावे. ते जर कमीचे निविदा दराने काम करण्यंास तयार असल्यास त्या प्रमाणेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सादर करण्यंात यावा.

सुचक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

अनुमोदक :- मा.श्री. घुले अ.ह.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक.२१
## सन-२००६-२००७.

विषय क्रमांकः-४ दिनांक ५/३/२००७

ठराव क्रमांकः- ४ दिनांक ५/३/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बुरूडगांव, सारसनगर, केडगांव, इंदिरानगर व नगर कल्याण रोड वरील आदर्श नगर मेघनंद कॉलनी भागात टॅन्कर्सद्वारे पाणी पुरवठा करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, महानगरपालिकेच्या उपरोक्त विभागात मे.गाडे ट्रान्स्पोर्ट अहमदनगर यांचे मार्फत मंजूर दरानुसार आहे. ऑक्टोंबर ०५ पासून १२ मे.टन क्षमतेच्या टॅन्कर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यांत येत आहे. त्यांना देण्यात आलेल्या कामाची मुदत माहे. सप्टेंबर ०६, पर्यत संपणार असल्याने उपरोक्त भागात टॅन्कर्स चालू ठेवणे आवश्यक आहे. किंवा कसे या बाबत संबंधीत शाखा अभियंता यांना पत्र दिले असता त्यांनी बुरूडगांव, केडगांव भागातील इंदिरानगर, व नगर-कल्याण रोडवरील आदर्श नगर, मेघनंद कॉलनी, साईराम सोसायटी, लोंढे मळा, खान वस्ती, शिंदे मळा, कबडेमळा, भांबरे/ जगताप वस्ती, भागात वितरण व्यवस्थेचे जाळे नसल्याने व सदरच्या वसाहती तुटक तुटक असल्याने सदर भागात टॅन्कर्सद्वारे पाणी पुरवठा करावा लागेल. तसेच सारसनगर परिसरही फार मोठा असल्याने काही वसाहती मध्ये जल वाहिन्या असूनही मुख्य जल वाहिनी अभावी पाणी पुरवठा होत नाही. त्यामुळे वरील चारही ठिकाणी टॅन्कर्सद्वारे पाणी पुरवठा करणे आवश्यक असल्याने कळविले आहे. त्या नुसार मे. गाडे, ट्रान्स्पोर्ट अ.नगर, यांचे कडून पुढील निविदा प्रक्रीया पूर्ण होई पर्यत टॅन्कर्सद्वारे पाणी पुरवठा मा.आयुक्त साहेब, यांचे पूर्व मंजूरी नूसार चालू ठेवण्यांत आले आहेत.

सदर कामाची दि. १३/१०/२००६ रोजी जाहीर निविदा दै. गांवकरी या वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दीस देण्यांत आली. दिनांक १३/१०/०६ ते २६/१०/०६ अखेर को-या निविदांची विक्री करण्यांत आली. सदर मुदतीत ६ को-या निविदांची विक्री झाली दिनांक ३१/१०/०६ रोजी दुपारी १.०० वा. च्या मुदतीत एकूण तीन सीलबंद निविदा प्राप्त झाल्या. सदरच्या सिलबंद निविदा दिनांक ३१/१०/०६ मा.उपायुक्त साहेब यांचे दालनात दुपारी ४.३० वाजता फोडल्या असता त्यामध्ये खालील प्रमाणे दर आलेले आहेत.

| अ.नं. | नांव | टॅन्करची क्षमता | प्रती दिन टॅन्कर भाडे | प्रती कि.मी दर |
|---|---|---|---|---|
| १ | दिपाली टॅान्स्पोर्ट, अ.नगर | ७.५ मे.टन<br>१०. मे.टन | -<br>१०२५/- | -<br>११.०५ |
| २ | बी.एस्.लोंढे, अ.नगर | ७.५ मे.टन<br>१० मे.टन | -<br>१०४९ | -<br>१२.०५ |
| ३ | साई एन्टरप्रायझेस, अ.नगर | ७.५ मे. टन<br>१०. मे. टन | -<br>१०५५ | -<br>१२.७५ |

उपरोक्त तुलणात्मक तक्ता पाहता त्या मध्ये १० मे.टनाचे दर दिपाली ट्रान्स्पोर्ट, अहमदनगर यांचे सर्वात लोएस्ट आलेले आहेत. मा.शासनाच्या दि.१६ नोव्हेबंर २०००चे परिपत्रकाच्या दरा पेक्षा (१० मे.टन प्रती दिन भाडे रू.१०७५.२०/-व प्रती कि.मी दर रू.९.४८) प्रती दिन भाडेचा दर कमी आहे. पंरतु प्रती कि.मी चा दर रू.१.२७ ने जादा आहेत.

तरी सदरचा तुलणात्मक तक्त्याचा ऑफीस रिपोर्ट निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे श्री. पी.बी. बापट हेड क्लार्क यांचा अहवाल असे.

प्रभारी उपशहर अभियंता श्री. सातपुते आर.जी :- H.C मागिल वर्षी २००५-२००६ चे दर नमूद करावे.

मागील वर्षीचे (२००५-०६) १० मे.टनाचे तडजोडी नुसार मंजूर केलेले दर खालील प्रमाणे

१० मे.टन प्रती दिन भाडे रू.१०५५ व प्रती कि.मी दर रू.९.७५ असे आहेत.

तरी ओदशार्थ सादर (सोबत स्था.स.चे मंजूर ठरावाची प्रत)

येणे प्रमाणे हेड क्लार्क श्री.बापट पी.बी.यांचा अहवाल असे.

प्रभारी उपशहर अभियंता श्री. सातपुते आर.जी. :- सदर टेंडरचे दर पहाता टॅन्कर भाडे १०२५/- व प्रती कि.मी दर ११.०५ नमुद आहे.सदर दरा मध्ये प्रती कि.मी दर मागिल वर्षी ९.७५ आहे. तरी सदर बाबत वाटाघाटी करिता बोलावणे योग्य वाटते. दि. ८/११/०६

शहर अभियंता श्री.मगर एन.बी.:- सर्वात कमी दराच्या निविदाधारकास वाटाघाटीसाठी बोलविण्यांत यावे.

मा.सादर,

विनंती रिपोर्ट की, १० मे.टन क्षमतेच्या पाण्याचे टॅन्कर्सच्या दराबाबत वाटाघाटी साठी सर्वात लोएस्ट दर असलेले दिपाली ट्रान्स्पोर्ट, अहमदनगर यांना बोलविले असता त्यांनी निविदे मध्ये दिलेल्या दराबाबत खाली नमुद केलेल्या दरानुसार काम करून देण्याचे कळविले आहे.

| टॅन्कर क्षमता | प्रती दिन भाडे | प्रती कि.मी दर |
|---|---|---|
| १० मे. टन | रू.९९५/- | रू.१०.७५/- |

या दराबाबत दि.२२/११/०६ रोजी इकडेस पत्र दिलेले आहे.तरी उचित आदेशार्थ रिपोर्ट सविनय. सादर.

उपरोक्त प्रस्तावा नुसार सन२००५-०६ चे मागील वर्षीचे १० मे.टन प्रती दिन भाडे रूपये १०५५/- व प्रती कि.मी दर रू. ९.७५/- असा मान्य केलेला होता.

सध्याचे सन २००६-२००७ करिता मे.दिपाली ट्रान्स्पोर्ट, अहमदनगर यांचे कमीचे दर १० मे.टनाचे प्रती दिन दर भाडे रू.१०२५ व प्रती कि.मी साठी रू.११.०५ असे दर आलेले आहेत. त्यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार त्यांनी १० मे.टना करिता प्रती दिन भाडेरू.९९५/- व प्रती कि.मी साठी रू.१०.७५ /- याप्रमाणे दर कमी करून देणेचे मान्य केलेले आहे. तथापि सन २००६-२००७ साठी १० मे.टन टॅन्कर साठी प्रती दिन भाडे रू.९७५/- व प्रती कि.मी रू.९२५/- या प्रमाणे दर मंजूर करणे योग्य वाटते आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री. सातपुते आर.जी. यांचा अहवाल असे.

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी :- मागील सन २००५-२००६ चे मंजूर दर प्रती दिनी भाडे रू.१०५५/- व प्रती / कि.मी ९=७५ असे होते. अहवालाप्रमाणे२००६-२००७ साठी टॅन्काचे दर रू.९७५/- प्रती दिन व प्रती कि.मी.भाडेरू.९=२५ रूपये या प्रमाणे दर मंजूर करणे योग्य वाटते आदेशार्थ सादर दि.२४/११/२००६

अं.ले.परिक्षक श्री. गोरे पी.आर. :- शहर अभियंता यांचे कडील प्रस्ताव 'अ' प्रमाणे रक्कम रू.९७५/- व रक्कम रूपये ९=२५(Per k.m) असे दरास मान्यता देणेस हरकत नाही. दि.२४/११/२००६

मा.उपायुक्त साहेब (सा) :- अहवालानुसार मंजूरी साठी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणे साठी शिफारस आहे. दि.२४/११/२००६

मा.आयुक्त साहेब :- स्पीक दि.२८/११/२००६.

मा.सादर,

निविदा दरपत्रके छाननी समितीच्या दि.६/२/२००७ रोजी झालेल्या बैठकी मध्ये सदर काम मे.दिपाली ट्रान्स्पोर्ट, अहमदनगर यांना प्रती भाडे रू. ९७५/- व प्रती कि.मी दर रू. ९.२५/- या दराने देणे बाबत समितीने शिफारस केली आहे. मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री. सातपुते आर.जी. यांचा अहवाल असे.दि.१५/२/२००७

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी. :- छाननी समितीच्या दिनांक ६/२/२००७ च्या शिफारसी नुसार मे.दिपाली ट्रान्स्पोर्ट,अ.नगर यांना टॅन्करचे प्रती दिन भाडे रू.९७५/- व प्रती कि.मी दर ९.२५ या दराने काम देण्यांस हरकत नाही . दि.१७/२/२००७

मा.उपायुक्त साहेब (सा) :- प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणे साठी शिफारस आहे.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दि.१७/२/२००७.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

विषय वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सदर कामाचे संबंधीत इंजिनिअर यांना माहिती देणे साठी बोलवावे.

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी.:- शहर अभियंता म्हणून मी माहिती सांगतो.ऑफीस रिपोर्टा मध्ये सर्व माहिती आलेली आहे.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे ऑफीस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- आपले आर्थिक वर्ष कधी पासून सुरू होते. प्रतेंक वर्षासाठी आपण निविदा मागवितो त्या आपण कधी मागवितो.

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी .:- एप्रिल नंतर निविदा मागविण्यांत येतात.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- पाण्याचे टॅन्करचे ठेकेदाराची मुदत कधी पर्यत होती.

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी.:- सप्टेंबर पर्यत होती.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. व मा.श्री. बारस्कर पो.ज. :- सप्टेंबर मध्ये टेंडर कसे काढले. मुदत संपण्याचे अगोदर टेंडर प्रोसिजर चालू करणे हवी होती याला जबाबदार कोण.

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी.:- जुनी मंजूरी होती ठेकेदाराची मुदत ऑक्टेबर २००५ ते सप्टेंबर २००६ पर्यत होती सप्टेंबर मध्ये मुदत संपली

मा.श्री.त्रिपाठी सु.चं. :- स्थायी समिती सभे मध्ये केलेल्या सुचने नुसार टेंडर मागविले ते चार महिने पांच दिवसांनी स्थायी समिती पुढे आले चार महिने जुन्या दराने पेमेंट केले त्यात जादा रक्कम दिली त्याचे काय ?

मा.श्री.जोशी अ.सु. व मा.श्री. तिवारी सु.र. :- या मध्ये महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले का?

मुख्य लेखा परिक्षक श्री. कदम अे.आर. :- त्या बाबत जबाबदारी निश्चित करावी लागेल.

मा.श्री. जोशी अ.सु.:- सहा महिन्या पूर्वी टेंडर स्थायी समिती पुढे आले असते तर नुकसान झाले नसते आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्‍चित करून संबंधीत कडून त्याची वसुली करण्यांत यावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- जादा दर आले असते तर स्थायी समिती पुढे आले असते.

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी.:- मी हे दर कमी करण्यांस सांगितले आहे.

मा.श्री.शेख मुदस्सरअ.इ.:-डिझेल दर कमी झालेले आहेत.निगोशिएशन मध्ये दर कमी होणे आवश्यक होते

मा.श्री. त्रिपाठी सु.च.:- स्थायी समिती पुढे हे प्रकरण येण्यास झालेल्या उशिराचे कारण काय ?

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी. :- सदर बाबत ऑफीस रिपोर्टा मध्ये उल्लेख आहे.

मा.श्री.शेख मुदस्सरअ.इ.:- पाणी टंचाई असलेल्या भागांचा ऑफीस रिपोर्टा मध्ये उल्लेख आहे. मुंकुदनगरचा त्यात उल्लेख नाही तो संबंधीत इंजिनिअर यांनी का केला नाही त्याचा जाब विचारणेत यावा त्यांचा रिपोर्ट सभे पुढे येउ द्यावा. मुंकुदनगर भागाचा त्यात समोवश करावा.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- या प्रकरणी म.न.पा.चे आर्थिक नुकसान झाले आहे का? जादा झालेल्या खर्च वसुली बाबत योग्य ती कारवाई करावी. ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- वॉर्डा मधील धार्मिक कामांसाठी तसेच टंचाई इत्यादी आवश्यक वेळी नगर सेवक पाण्याचे टॅन्कर मागवितात मात्र ऑफीस सदर टॅन्करचा खर्च नगरसेवकांकडून वसुल करतात ते पैसे नगर सेवकांकडून वसुल करू नयते. श्री.मगरसाहेब आपले सध्या किती पाण्याचे टॅन्कर चालू आहेत.

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी. :- एकूण पांच टॅन्कर चालू आहेत.

मा.श्री. सय्यद सा.अ.:- कोठला झोपडी पट्टी भागात पाण्याची जास्त टंचाई आहे. तेथील नागरिक बोअरचेंच पाणी वापरतात.

मा.श्री.शेख आरिफ शेख. र. :- तेथे फक्त दोनच बोअर असल्याने नागरिकाचे त्यामुळे हाल होतात.

मा.श्री. सय्यद सा.अ.:- कोठला झोपडीपट्टी भागासाठी पाण्याचा एक टॅन्कर चालू करावा.

मा.श्री.शेख मुदस्सरअ.इ.:- मुंकुदनगर साठी एक ट्रॅक्टर वरील पाण्याचा टॅन्कर चालू करावा.

मा.सभापती साहेब :- नगर कल्याण रोड वरील आदर्श नगर, मेघनंद कॉलनी, भावनाऋषी इत्यादी सोसायटया हया लांब लांब चे भागात असल्याने नगर कल्याण रोड भागासाठी एक ऐवजी दोन पाण्याचे टॅन्कर चालू करावेत.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मुख्य लेखा परिक्षक श्री.कदम अे.आर :- आलेले पाण्याचे टॅन्करचे दर आज पासूनच लागु करावेत.

मा.सभापती साहेब :-ऑफीस रिपोर्टा मध्ये दर्शविल्या नुसार पाणी टॅन्करचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी .वॉर्डा मधील धार्मिक तसेच टंचाईचे वेळी मा. नगर सेवकांनी पाण्याचे टॅन्कर मागविल्यास पाण्याचे टॅन्करचा खर्च त्यांचे कडून वसुल करू नये. नगर कल्याण रोड भागातील शिवाजी नगर इत्यादी परिसरासाठी एक ऐवजी दोन पाण्याचे टॅन्कर चालू करण्यांत यावे तसेच कोठला झोपडपट्टी भागासाठी व मुंकुदनगर भागासाठी प्रतेंकी एक पाण्याचा टॅन्कर चालू करणेत यावा. टॅन्कर ने पाणी पुरवठा करणे विषयी निविदा प्रक्रीया वेळे मध्ये पूर्ण न करता जादा दराने पेमेंट अदा केल्या मुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्‍चित करून ती वसुली बाबत पुढील कार्यवाही करण्यांत यावी. ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बुरूडगांव, सारसनगर, केडगांव, इंदिरानगर व नगर कल्याण रोड वरील आदर्श नगर मेघनंद कॉलनी भागात टॅन्कर्सद्वारे पाणी पुरवठा करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बुरूडगांव, सारसनगर, केडगांव, इंदिरानगर व नगर कल्याण रोड वरील आदर्श नगर मेघनंद कॉलनी इत्यादी भागात टॅन्कर्सद्वारे पाणी पुरवठा करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्क तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्टा वर सभे मध्ये झालेल्या चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

कार्यालयाने सुचविल्या नुसार दहा मेट्रीक टन पाण्याचे टॅन्कर साठी प्रती दिन भाडे रूपये ९७५/- (रूपये नउशे पंच्याहत्तर फक्त) व प्रती कि.मी रूपये ९=२५ /- (रूपये नउ पैसे पंचवीस फक्त) या प्रमाणे दर मंजूर करणेस मंजूरी देण्यांत येत आहे .ऑफीस रिपोर्ट मंजूर.

वॉर्डा मधील धार्मिक व पाणी टंचाईचे आवश्यक वेळी नगरसेवकांनी मागविलेल्या पाण्याचे टॅन्करचा खर्च नगरसेवकांकडून वसुल करण्यांत येउ नये.

नगर कल्याण रोड भागातील शिवाजी नगर इत्यादी परिसरासाठी एक ऐवजी दोन टॅन्करने पाणी पुरवठा करणेत यावा तसेच कोठला झोपडपट्टी भाग व मुंकुदनगर भागासाठी पाणी पुरवठा करणे साठी पाण्याचा एक टॅन्कर चालू करणेत यावा.तसेच मा. सदस्य यांनी केलेल्या सुचना नुसार भविष्यातील टॅन्करचा खर्च कमी होणे करिता पाणी पुरवठया साठी आवश्यक पाईप लाईनची काम तातडीने करण्यांत यावी.

टॅन्कर ने पाणी पुरवठा करणे विषयी निविदा प्रक्रीया वेळे मध्ये पूर्ण न करता जादा दराने पेमेंट अदा केल्या मुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करून ती वसुल करणे बाबत पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. त्रिपाठी सु.चं.

अनुमादेक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.